**अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी यादी**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**सर्व शिक्षा अभियानांतर्गत भरती केलेल्या कर्मचाऱ्यांना**
**महानगरपालिकेने पगार दिले नसल्याबाबत**

**(१) १८०५ (२९-०१-२०१५). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत महापालिकेने कर्मचा-यांची भरती केली होती, सर्व शिक्षा अभियानांतील कर्मचा-यांना मागील ५ महिन्यापासून पगार मिळाला नसल्याचे माहे सप्टेंबर-२०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचा-यांना प्रलंबित पगार लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अप्पर आयुक्त स्तरावर विविध अपीले प्रलंबित असणेबाबत**

**(२) २७८३ (१०-०४-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयातील शेती विषयक, नगर पालिकेतील जागा विषयक तसेच ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेतील वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांच्या प्रश्नावरील अपीले अप्पर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे मोठया प्रमाणावर अनेक काळापासून प्रलंबित राहिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरीकांना प्रथम जिल्हा स्तरावर, नंतर विभागीय आयुक्त स्तरावर न्याय मिळण्यासाठी झगडावे लागत असल्याने न्यायालयाप्रमाणेच फास्टट्रॅक कोर्टच्या धरतीवर अपील प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याबाबतची मागणी परभणी - हिंगोलीचे स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी सन २०१४-१५ दरम्यान मा.महसूल मंत्री यांच्याकडे केली आहे काय,
(३) असल्यास, नागरीकांना विहित मुदतीत न्याय देण्यासाठी व अपीले निकाली काढण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-१२-२०१५) :** (१), (२) व (३) अपर आयुक्त औरंगाबाद यांचेकडील प्रलंबित अपीले सत्वरतेने निकाली काढण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयातील तीन उपायुक्त यांचेकडे वर्ग करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शाळांमध्ये मुलांना होत असलेली मारहाण थांबविण्याबाबत**

**(३) ४२०५ (२०-०४-२०१५). श्री.माणिकराव ठाकरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बालकांचे मोफत व शक्तीचे शिक्षण हक्क कायद्यात शाळेमध्ये मुलांना मारहाण करणे कायद्याने गुन्हा असूनही राज्यातील शाळेमध्ये सुमार ३४ टक्के मुलांना मारहाण करण्यात येत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांमध्ये मुलांना होत असलेली मारहाण थांबविण्याबाबत तसेच मुलांना मारहाण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-११-२०१५) :** (१) राज्यातील शाळेमध्ये सुमारे ३४ टक्के मुलांना मारहाण करण्यात येत असल्याचे आढळून आलेले नाही.
(२) शाळांमधील बालकास शिक्षा करणाऱ्या वा तत्सम त्रास देणाऱ्या शिक्षकाविरुध्द वा व्यक्तीविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत शासन निर्णय, दिनांक २५/०१/२०११ अन्वये आदेश दिले आहेत. शाळांमध्ये मुलांना मारहाण झाल्याबाबत तक्रार आल्यास त्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी यांचेकडून चौकशी करण्यात येते व तक्रारीत तथ्य आढळल्यास दोषींविरुध्द कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळावर जवळपास तीन हजार कोटी रुपयांचे कर्ज असल्याबाबत**

**(४) ४२४३ (२३-०४-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळावर (एमएसआरडीसी) जवळपास तीन हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे कर्ज कोणत्या कारणांसाठी केव्हा काढण्यात आले होते, त्याची परतफेड कोणत्या कारणांमुळे झाली नाही व सदर कर्जाची परतफेड किती कालावधीत कशाप्रकारे करण्यात येणार आहे,
(३) उक्त महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत व त्याची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार योजनेची मंजूरी व त्यास शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची तरतूद लक्षात घेवून महामंडळाने कर्जाची उभारणी केली आहे.

महामंडळाकडून कर्ज व व्याजाची परतफेड वेळेत केली जाते. पथकर तसेच पथकर महसूलाचे सुरक्षितीकरणामार्फत (Securitization) मिळणारे अग्रिम उत्पन्न महामंडळाकडे

असलेल्या भूखंडाचा विकास व वाणिज्यिक वापर, जाहिराती इत्यादी मार्फत मिळणाऱ्या उत्पन्नाद्वारे महामंडळाकडून कर्जाची परफेड प्रस्तावित आहे.

(३) (अ) महामंडळाने विशेष नियोजन प्राधिकरणामार्फत मुंबई पुणे द्रुतगती महामार्गालगतच्या जमीनीचा वाणिज्यिक वापर, नेपीयन्सी रोड व बांन्द्रा येथील भूखंडाचा विकास व वाणिज्यिक वापर, मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाची क्षमतावाढ आणि मुंबई ते नागपूर द्रुतगती महामार्ग इत्यादी विविध प्रकल्प राबविण्याचे योजले आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी झाल्यास महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल.

(ब) वरील प्रकल्पांसाठी महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नेमण्यासाठीचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत.

---

## बिलोली (ता.जि.नांदेड) येथील तालुकास्तरावर असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयाच्या इमारतीबाबत

**(५) ४३८० (१०-०४-२०१५). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (ता.जि.नांदेड) येथील तालुकास्तरावर असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयाची इमारत पूर्ण झाली असून दोन विभागाच्या अधिकाऱ्यात ताळमेळ नसल्याने जवळपास कोटीचा खर्च झालेली सदरहू इमारत केवळ शोभेची वास्तू असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गांधीनगरच्या मार्गावर असलेल्या रजिस्ट्री ऑफिसची इमारत पूर्ण झाली आहे अद्ययावत बांधकाम व अंतर्गत सुव्यवस्था असलेल्या नूतन इमारतीवर ७५ लाख रुपये खर्च करण्यात आला असुन शासनाला महसुल मिळवून देणाऱ्या या कार्यालयीन इमारतीमध्येच एका माजी नगरसेवकाने अतिक्रमण करून दुकान थाटले असल्याने या इमारतीच्या संरक्षक भिंतीचे कामही थांबले आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कारवाई करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) काम पूर्ण. प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरसाठे (ता.इगतपुरी जि.नाशिक) येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्यात आलेली आश्रमशाळा याच ठिकाणी सुरु करण्याबाबत

**(६) ४४१२ (२३-०४-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरसाठे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्यात आलेली आश्रमशाळा शिरसाठे याच ठिकाणी सुरु करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-११-२०१५) :**(१) हे, खरे आहे.

श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), मा.विधानसभा सदस्य यांनी लहांगेवाडी, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथे सुरु असलेली शासकीय आश्रमशाळा शिरसाठे, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथे सुरु करण्याबाबत मा.मंत्री (आदिवासी विकास) यांना दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी निवेदन दिले आहे.

(२) शासकिय आश्रमशाळा शिरसाठे, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथील सोयी सुविधाअभावी (इमारत, पाणीपुरवठा इ.) इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची गैरसोय व शैक्षणिक नुकसान होवु नये याकरिता सदर शाळा शासन आदेश दि.२०/११/२०१३ अन्वये लहांगेवाडी, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथे कायमस्परुपी स्थलांतरीत केली आहे. सदर वस्तुस्थिती आयुक्त, आदिवासी विकास यांच्या दि.९/१/२०१५ च्या पत्रान्वये श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), मा.विधानसभा सदस्य यांना कळविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतून वगळण्यात आलेल्या २७ गावांमध्ये सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामावर करावयाची कारवाई**

**(७) ४४१९ (०९-०४-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतून वगळण्यात आलेल्या २७ गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम सुरू असून ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास येवूनही कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष करणा-या संबंधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची “विशेष नियोजन प्राधिकरण” म्हणून या अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्ती झाल्यानंतर या अधिसूचित क्षेत्रातील एकूण २४४ इतक्या बांधकामासाठी तपासणी करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत सदरची बांधकामे अनधिकृत घोषित केली आहेत. ३ प्रकरणी न्यायालयात दावे दाखल आहेत. सदरची बांधकामे निष्कासीत करणे करीता पोलीस बंदोबस्ताची मागणी केली असून पोलीस बंदोबस्त प्राप्त होताच निष्कासन कारवाई केली जाईल.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अलिबाग व पेण (जि.रायगड) तालुक्यातील गावतलावांचे नुतनीकरण व खोली वाढविणेसाठी निधी मिळण्याबाबत**

**(८) ४५१५ (०८-०४-२०१५). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग व पेण (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण भागातील गाव तलावांचे अनेक वर्षे नुतनीकरण, गाळ काढणे इत्यादी कामे न केल्याने पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विशेष निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) जिल्हा परिषद स्तरावरुन जिल्हा परिषद सेस अंतर्गत निधी उपलब्धतेनुसार गाव तळयांची कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नियोजित उन्न्ती सहकारी गृहरचना संस्थेस जागा देण्याबाबत**

**(९) ४७७७ (०९-०४-२०१५). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वारजे माळेवाडी (ता.हवेली, जि.पुणे) येथील जमिनीचा सर्व्हे नं. ३६ (१), ३६ (२), ३५ (१) व ३५ (२) ही जमीन शासनाने विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या आदर्श वसाहतीसाठी राखून ठेवली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नियोजित उन्न्ती सहकारी गृहरचना संस्थेस जागा देण्याबाबत दिनांक २३ ऑक्टोबर, १९९६ रोजी वा त्यासुमारास मा.मुंबई उच्च न्यायालयाने दोन निर्णय देवूनही त्याप्रमाणे या संस्थेने सन १९९५ ते फेब्रुवारी, २०१३ पर्यंत मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व संबंधित जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देवूनही अद्याप या संस्थेस शासनाने जागा दिली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीचे उमेदवार नाही अशा संस्थेस शासनाने सदर जागेमधील काही जागा दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नियोजित उन्नती सहकारी गृहरचना संस्था, पुणे या संस्थेस त्वरीत जागा देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :** (१) मौजे वारजे, तालुका हवेली येथील सर्व्हे क्र. ३५/२ व ३६/२ च्या गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्कात “भटक्या विमुक्त जातीच्या आदर्श वसाहतीसाठी” अशी नोंद आहे.
(२) उन्नती सहकारी गृहरचना संस्थेस अद्याप सदर जागा प्रदान केल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) व (६) मंत्रालयीन इमारतीच्या दिनांक २१/०६/२०१२ रोजीच्या आगीमध्ये या विभागाचे अभिलेख नष्ट झाले असल्याने यापूर्वी झालेल्या कार्यवाहीचा बोध होत नाही. तथापि, यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून पुनर्बांधणी प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील अमडापूर लघूप्रकल्पात मुबलक पाणीसाठा नसल्याबाबत**

**(१०) ५१९९ (०८-०४-२०१५). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यात बांधलेला अमडापूर लघूप्रकल्प २४१ हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या बंधा-यात मुबलक पाणीसाठा नसल्याने सन २००५ ते २०१४ पर्यंत या प्रकल्पातून एक हेक्टर हि जमीन ओलीताखाली आली नसल्याची व प्रकल्पाग्रस्तांना मोबदल्यापासून वंचित ठेवल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २००४ साली पूर्ण झालेल्या या प्रकल्पाची मुख्य भिंत, सांडवा, पुच्छमार्ग, कालवा, पाटच-या आदींच्या कामात तांत्रिक व आर्थिक मापदंड सोडून अभियंता व ठेकेदारांनी गैरप्रकार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित प्रकल्पग्रस्तांना त्वरित मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-११-२०१५) :** (१) व (२) खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या अनुदानित वसतीगृहांकडील विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची पदे मंजुर करणेबाबत**

**(११) ५३१४ (१७-०४-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित वसतीगृहांसाठी विद्यार्थी संख्येनुसार कर्मचाऱ्यांची पदे मंजुर करण्यात यावीत, अशी मागणी खाजगी आदिवासी संस्थाचालक संघटनेकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत २४ ते ४८ विद्यार्थी संख्येस १ अधीक्षक, १ स्वयंपाकी व १ पहारेकरी इतकीच पदे मंजुर असुन ५४ ते ३१४ विद्यार्थी संख्येपर्यंत शासन मान्य कर्मचारी संख्या १ अधीक्षक, २ स्वयंपाकी, १ मदतनीस, १ पहारेकरी इतकीच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीनशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांसाठी अधीक्षक व स्वयंपाकी ही पदे पुरेशा संख्येने मंजुर नसल्यामुळे स्वयंपाक वेळेवर न होणे आणि कामाचे नियोजनात अनेक अडचणी उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची पदे मंजुर करणेबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-१२-२०१५) :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१५ अन्वये अनुदानित वसतिगृहास ४८ विद्यार्थी मान्य संख्येपर्यंत १ अधीक्षक, १ स्वयंपाकी व १ पहारेकरी अशी ३ पदे मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच, ४८ विद्यार्थी संख्येच्या पुढे १ अतिरिक्त स्वयंपाकी व १ मदतनीस अशी एकूण ५ पदे अनुज्ञेय आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

(४) शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २००५ अन्वये अनुदानित वसतिगृहास ४८ विद्यार्थी मान्य संख्येपर्यंत १ अधीक्षक, १ स्वयंपाकी व १ पहारेकरी अशी ३ पदे मंजूर करण्यात आलेली आहे.

तसेच, ४८ विद्यार्थी संख्येच्या पुढे १ अतिरिक्त स्वयंपाकी व १ मदतनीस अशी पदे मंजूर करण्यात येतात. तथापि, यापेक्षा जास्त विद्यार्थी संख्येस आणखी अतिरिक्त पदे मंजूर करण्याबाबत प्रचलित शासन निर्णयात तरतूद नाही. तथापी याबाबतची शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.

---

**राज्यातील नगरपालिकामधील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपुर्ती खर्च देण्याबाबत**

**(१२) ५४८९ (२०-०४-२०१५). श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपालिकामधील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपुर्ती खर्च देण्याविषयी सततची मागणी होत असून दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अमरावती विभाग शिक्षक आघाडीने सुध्दा मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नगरपालिकेमध्ये कार्यरत शिक्षकास वैद्यकीय प्रतिपुर्ती देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील नगरपालिकेमध्ये कार्यरत शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपुर्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-१२-२०१५) :** (१) होय.

(२) अशंत: खरे आहे.

(३) निश्चित केलेल्या दराने प्रतिपूर्ती प्राथमिक शिक्षकांना देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेली ऑनलाईन टॅक्सी बुकिंग सेवा बंद करण्यात आल्याबाबत**

**(१३) ५५८५ (१०-०४-२०१५). श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व ज्येष्ठ नागिरकांसाठी सुरू करण्यात आलेली ऑनलाईन टॅक्सी बुकिंग सेवा माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास बंद करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन टॅक्सी बुकिंगवर बंदी असतानासुद्धा काही कंपन्या बुकिंग सेवा पुरवित असल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, ऑनलाईन बुकिंगसाठी कोणत्याही प्रकारचा नियम अस्तित्वात नसून केवळ मोबाईल ॲप डाऊनलोड करुन ऑनलाईन भाडे आकारणी पद्धत सध्या सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अप्लीकेशनमध्ये प्रवासाची माहिती नोंदविल्यास ऑनलाईन पद्धतीने लगेच खात्यातून पैसे वजा होतात अशा प्रकारच्या तक्रारी होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याविषयी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-१२-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे टॅक्सी व्यवसाय करणाऱ्या समुच्चयकाबाबत (Aggregator) प्रारुप नियमावली प्रसिध्द करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खाजगी मालकीची जमिन संपादित करून बंजारा समाजाच्या तांड्याच्या राहण्यासाठी जमीन मालकी हक्क करण्याबाबत**

**(१४) ५९७३ (१६-०४-२०१५). श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद परिसरातील बंजारा समाजाचा तांडा क्र.२ व ३ हा खाजगी जमिनीवर गट क्र.२४१, गट क्र.२७४, गट क.२७१ वर वसलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर तांडयावर रोड, नाल्या, पाण्याची टाकी, शाळा, अंगणवाडी इत्यादी सोयी सुविधा दिलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमीन खाजगी मालकीच्या असल्याने व गावठाण म्हणून जाहिर न झाल्याने भविष्यात तांडयांवर राहणा-यांना अडचणी येऊ शकतात, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरित कार्यवाही करून तांडयांची वसाहती संपादित करून मालकी हक्क करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-१२-२०१५) :** (१) व (२) होय.
(३) व (४) सदर जमीन खाजगी मालकीची असल्याने भविष्यात अडचणी निर्माण होऊ शकतात त्यामुळे सदर जमीन संपादनासाठी महसूल व वन विभागाचा सल्ला घेवून कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खाजगी शाळांना स्वतःची मैदाने नसल्याबाबत**

**(१५) ६०२३ (२०-०४-२०१५). श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दिंडोशी येथील शिवशाही प्रकल्पात इंग्रजी आणि उर्दू माध्यमाच्या व सरकारी मान्यता असलेल्या खाजगी शाळांना स्वतःची मैदाने नसल्यामुळे शाळेच्या मुलांच्या क्रीडास्पर्धा रस्त्यावर घेण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर परिसरातील शाळांमधील विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान पाहता क्रीडा मैदाने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-११-२०१५) :** (१) व (२) उर्दू माध्यमाच्या विनाअनुदानित एका शाळेस क्रिडांगण नसल्याने व शाळेजवळच्या, महानगरपालिकेच्या मैदानास टाळे असल्याने या शाळेने जानेवारी, २०१५ मध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा रस्त्यावर घेतल्या.
(३) शाळेस जवळचे महानगरपालिकेचे मैदान उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाहीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरालगत सुयोजीत बिल्डकॉम प्रा.लि. या बांधकाम कंपनीने मोठया प्रमाणावर शेत जमिनी त्यांचे नावे खरेदी केल्याबाबत**

**(१६) ६०४६ (१६-०४-२०१५). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरालगत सुयोजीत बिल्डकॉम प्रा.लि. या बांधकाम कंपनीने मोठया प्रमाणावर शेत जमिनी त्यांचे नावे खरेदी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीच्या नावे शेत जमीन खरेदी करण्यासाठी कूळ कायद्याच्या कलम ६३ अन्वये आवश्यक ती परवानगी घेण्यात आलेली आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी महसुल विभागाद्वारे काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :** (१) व (२) नाशिक शहरालगत सन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.या कंपनीने काही मिळकती खरेदी केल्या आहेत. सदर मिळकतींपैकी काही मिळकती श्री.अनंत केशव राजेगावकर हे संचालक असलेल्या सुयोजीत बिल्डकॉम प्रा.लि.या कंपनीकडून खरेदी केल्या आहेत. श्री.अनंत केशव राजेगावकर हे सुयोजीत बिल्डकॉम प्रा.लि.या बांधकाम कंपनीचेही संचालक आहेत. महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतजमिन अधिनियामाच्या कलम ८८(१)(ब) अन्वये नाशिक महानगरपालिका क्षेत्र शासन राजपत्र अधिसूचना क्र.टिएनसी/४०८/सी/आर/३७०/एल-९, दिनांक ३/०१/२००९ अन्वये अधिसुचित करण्यात आले आहे. त्यामुळे या महानगरपालिका क्षेत्रात रहीवास विभागातील शेतजमिन खरेदी करण्यास उक्त अधिनियमातील कलम ६३ च्या परवानगीची आवश्यकता नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मातंग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशी लागू करण्याबाबत**

**(१७) ७०३३ (०४-०८-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मातंग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशी लागू करण्याचा निर्णय केव्हा घेण्यात आला आहे,
(२) असल्यास, घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१५) :** (१) व (२) मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्याचे दृष्टीने शासनाने क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग स्थापन करण्यात आला होता. या विभागाच्या दिनांक ३१/१२/२०११ च्या शासन निर्णयान्वये क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनास सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशींपैकी ६८ शिफारशी तत्वत: मान्य करण्यात आल्या असून त्याबाबत विविध विभागांकडून अंमलबजावणी करण्यात येत आहे. आरक्षणा विषयक शिफारशीसह उर्वरित १४ शिफारशी अमान्य करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विशेष मागास प्रवर्ग अ (एसबीसी-ए) करीता शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश आणि लोकसेवांमधीत नियुक्ती किंवा पदांमध्ये आरक्षण मिळण्याबाबत**

**(१८) ७०४१ (०३-०८-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील विशेष मागास प्रवर्गाच्या अ (एसबीसी-ए) प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेश आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्या किंवा पदांच्या आरक्षणासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, दिनांक १९-७-२०१४ व शासन अध्यादेश क्र. १४ दिनांक ९-७-२०१४ अन्वये राज्यातील मागास एसबीसी-ए प्रवर्गासाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवेमधील नियुक्त्या यासाठी ५ टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. त्याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४-११-२०१४ रोजी अंतरित निर्णय दिला. उपरोक्त अध्यादेश अस्तित्वात असेपर्यंत शैक्षणिक संस्थेमधील प्रवेश सुरु ठेवल्यास न्यायालयाने अनुमती दिली व राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवेमधील नियुक्त्या करण्यास स्थगिती दिली. दिनांक २३-१२-२०१४ पर्यंत अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर होऊ शकले नाही. सदर अध्यादेश व्यपगत झाला आहे. मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णय विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पीक विमा योजनेमध्ये बदल करून नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(१९) ७२८६ (३१-०७-२०१५). श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरवर्षी होणाऱ्या अतिवृष्टी किंवा अवर्षणामुळे राज्यात शेतातील पिकांचे फार मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पीक विमा योजनेमध्ये आमुलाग्र बदल करुन या होणाऱ्या नुकसानाची जास्तीत जास्त भरपाई करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित नवीन धोरणाची विस्तृत माहिती काय आहे,

(४) नसल्यास, पीक विमा धोरणात बदल न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-५०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) राष्ट्रीय कृषी विमा योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

---

**नाभिक समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्याबाबत**

**(२०) ७४१० (०४-०८-२०१५). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात नाभिक समाजाची लोकसंख्या ३५ लाखांपेक्षा जास्त असून केसकर्तनालय (सलून) व्यवसाय असलेल्या नाभिक समाजाचा अनुसूचित जाती मध्ये समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खोपट (ठाणे) येथील बस आगार परिसरातील बसस्थानकांच्या व कर्मचारी विश्रांती कक्षाच्या दुरवस्थेबाबत**

**(२१) ७५६७ (३१-०७-२०१५). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांचे आधुनिकीकरण करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्यानुसार विविध बस स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे येथील खोपट आगारातील बस स्थानकामध्ये एस.टी. चे वाहक आणि चालक यांच्या विश्रांतीसाठीची व्यवस्था नसल्याने निवासाची सोय ही ओपन डॉमेंटरी स्वरुपाचे

असून तिथे स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याचेही दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच खोपट आगार या बसस्थानकाच्या परिसरात सफाई कर्मचा-यांचा अभाव असल्याने तेथे साफसफाई होत नसून धूळ, गुटख्यांची पाकीटे यामुळे डास आणि उंदीर-घुशी यांचा उपद्रव असल्याने त्याचा विपरित परिणाम बसचालक व वाहकांच्या कार्यक्षमतेवर व आरोग्यावर परिणाम झाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खोपट येथील बस स्थानकाच्या दुरावस्थेबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, याप्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्य परिवहन खोपट बसस्थानक हे १५ फलाटांचे असून त्यामध्ये प्रवाशांसाठी आसनाची, पिण्याच्या पाण्याची व प्रसाधनगृहाची सोयी उपलब्ध आहेत. तसेच प्रवाशांसाठी संगणकीय आरक्षण व्यवस्था उपलब्ध आहे. सदर बसस्थानक व्यवसायिक संकुलासह मे, २००७ मध्ये कार्यान्वित झाले असून सुस्थितीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात संघटीत गुन्हेगारीप्रमाणे फोफावणाऱ्या सायबर क्राईमला रोखण्यासाठी शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र सायबर सेल स्थापन करण्याबाबत

**(२२) ७८०२ (०६-०८-२०१५). श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्रीमती स्मिता वाघ, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३७९४ ला दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संघटीत गुन्हेगारीप्रमाणे फोफावणाऱ्या सायबर क्राईमला रोखण्यासाठी शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र सायबर सेल स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

मात्र राज्यात सायबर गुन्ह्यांच्या प्रभावी तपासासाठी सर्वात प्रथम मुंबई आयुक्तालय (२००१) येथे व तद्‌नंतर पुणे आयुक्तालय, ठाणे शहर व नवी मुंबई येथे सायबर गुन्हे अन्वेषण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

संगणक क्षेत्रात होणाऱ्या गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता शासनाने एप्रिल, २००९ मध्ये मुंबई येथे स्वतंत्र सायबर पोलीस ठाण्याची स्थापना केली आहे. तसेच राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालयामध्ये व जिल्हास्तरीय कार्यालयात उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामुग्रीमधून एकूण ४३ आयुक्तालये/घटक या ठिकाणी सायबर क्राईम सेल स्थापन करण्यात आलेले असून त्यानुषंगाने दाखल होणाऱ्या गुन्ह्यांवर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होवून योग्य ती कारवाई केली जाते.

सायबर गुन्ह्याचा तपास कौशल्याने व्हावा याकरिता संपूर्ण राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांचे घटकातील 'सायबर क्राईम सेल' मध्ये नेमलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांना लेव्हल - १ व लेव्हल-२ असे प्रशिक्षण C-DAC, NASSCOM व DSCI यांसारख्या नामांकित संस्थांकडून दिले जाते. सायबर क्राईमच्या संबंधित गुन्हे राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात नोंदविले जावून त्यानुषंगाने पुढील कारवाई केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरात पावसाळयात अनेक भागात पाणी साचून जनजीवन विस्कळीत होत असल्याबाबत**

**(२३) ८२६३ (०६-०८-२०१५). श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात पावसाळयात अनेक भागात पाणी साचून जनजीवन विस्कळीत होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहर हे देशातील ५ महत्वाच्या शहरातील एक शहर असून तेथील सात मोठे नाले एक नदी व २३५ लहान नाले यांच्या विकासबाबत नागपूरच्या विकास आराखडयात समावेश आहे काय,

(३) असल्यास, २००६ मध्ये २४५ कोटीचा गटार लाईन, स्ट्रॉम ड्रेन, मलःनिस्सारण प्रकल्प यासाठी प्रस्ताव केंद्र व राज्य शासनाकडे पाठविला होता काय,

(४) याबाबत नागपूर शहरातील आर्किटेक्ट व प्लॅनर असोशिएनने तक्रार केली आहे काय,

(५) असल्यास, शासनाची भूमिका व उपाययोजना काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :**(१) नागपूर शहराच्या सखल भागात असलेल्या वसाहतीत काही अंशी पाणी साचून राहते, ही बाब खरी आहे.

(२) नागपूर शहराच्या स्ट्रॉम वॉटर ड्रेन करिता तयार करण्यात आलेल्या बृहत आराखड्यात एकूण ४५ मोठे व ८० छोटे नाले आहेत तसेच पिवळी, नाग व पोरा अशा ३ नद्या आहेत.

(३) स्ट्रॉम वॉटर ड्रेन बाबत असा कोणताही प्रस्ताव राज्य अथवा केंद्र शासनाकडे पाठविलेला नाही.

तथापि, मल:निस्सार करिता उत्तर सिवरेज झोन संदर्भात सीवेज कलेक्शन सीस्टीम प्रकल्पाला केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम अंतर्गत २५/२/२०१४ अन्वये रु.४९१.१४ कोटीच्या प्रस्तावास मंजूरी मिळालेली होती. मात्र शासकीय अनुदान प्राप्त झालेले नाही.

(४) महापालिकेकडे अशी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) नागपूर शहराची ड्रेनेज सीस्टीम सुधारण्याकरिता स्ट्रॉम वॉटर ड्रेन चा बृहत आराखडा तयार करण्याचे काम नागपूर महापालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

---

**राज्यातील गौण खनिजांचा स्वामित्व धनावरील अनुदानाचे वाटप करण्याबाबत**

**(२४) ८४६२ (३१-०७-२०१५). श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९८५ पासून राज्यातील गौण खनिजांचा स्वामित्व धनावरील अनुदानाचे वाटप संबंधीत ग्रामपंचायतींना करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) गौण खनिजाच्या स्वामित्व धनावरील अनुदान संबंधीत ग्रामपंचायतीना न दिल्यामुळे ग्रामपंचायतीच्या विकास कामांना फार मोठा अडथळा निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गौण खनिजांच्या स्वामित्व धनावरील अनुदान संबंधीत ग्रामपंचायतींना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

प्रत्येक वर्षी या विभागाकडून गौण खनिजावरील स्वामित्व धनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकित रकमांचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात येतात. सदर मंजूर झालेल्या अनुदानाचे वाटप जिल्हाधिकारी कार्यालयांकडून तहसिलदार कार्यालयामार्फत संबंधित ग्रामपंचायतींना करण्यात येते.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महापालिकेने एकाच प्रभागातील व्यायामशाळेस सव्वा कोटी रुपयांचे साहित्य दिल्याबाबत**

**(२५) ८८८१ (०६-०८-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेने मागील चार वर्षात विविध व्यायाम शाळांमध्ये व्यायामाचे साहित्य पुरविण्यासाठी सुमारे साडेसात कोटी रुपये खर्च केले आहेत यापैकी सव्वा कोटी रुपयाचे साहित्य हे केवळ १३ ब या एकाच प्रभागाला देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया मोठया रकमेचे व्यायाम शाळेचे साहित्य देताना शासनाने कोणते निकष वापरले आहेत वा येत आहेत,

(३) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) पुणे महानगरपालिकेने सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या ४ वर्षात विविध व्यायाम शाळांमध्ये व्यायामाचे साहित्य पुरविण्यासाठी मध्यवर्ती भांडार विभागामार्फत रुपये ५.४१ कोटी रुपयांची व्यायाम साधने खरेदी केली आहेत.

यापैकी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाच्या कालावधीत प्रभाग क्रमांक १३-ब करिता रुपये ७२.४१ लक्ष रुपयाचे व्यायाम साहित्य खरेदी करण्यात आले आहे.

(२) पुणे महानगरपालिकेतर्फे व्यायाम साहित्य वाटप करताना यापूर्वी कोणतीही नियमावली/नियम नसल्याने विभाग/प्रभागांच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रकातील उपलब्ध निधीनुसार मध्यवर्ती भांडार विभागाकडून निविदा प्रक्रिया राबवून व्यायाम साहित्य खरेदी करण्यात येवून, वाटप करण्यात येत होते.

व्यायाम साहित्याचे समप्रमाणात वाटप व्हावे व त्यामध्ये सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने व्यायाम साहित्याचे वाटप करण्याबाबत पुणे महानगरपालिकेने दिनांक २३-३-२०१५ रोजी मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. त्यानुसार व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सायाळ (ता.लोहा) येथील ग्रामसेवकांच्या मनमानी कामामुळे ग्रामस्थांना होणारा त्रास**

**(२६) ८९४३ (३१-०७-२०१५). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायाळ (ता.लोहा) येथील ग्रामसेवकांचा मनमानी कारभार वाढला असून मुख्यालयी न रहाणे, विविध शैक्षणिक कामांसाठी विद्यार्थ्यांची हेळसांड करणे अशा अनेक तसेच शासकीय योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित न करणे अशा प्रकारांमुळे नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील ग्रामसेवक याच्या कामांची चौकशी करुन संबंधित ग्रामसेवकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१) नाही. अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) संबंधित ग्रामसेवक यांच्या कामांची चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार सायाळ (ता.लोहा) येथील ग्रामसेवकांविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ चे कलम ४ नुसार जिल्हा परिषद स्तरावर प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सरकारी मनोरुग्णालयांचा दर्जा सुधारण्यासाठी रुग्णालये खाजगी तत्वावर चालविण्याबाबत**

**(२७) ८९८९ (०३-०८-२०१५). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सरकारी मनोरुग्णालयांचा दर्जा सुधारण्यासाठी सदर रुग्णालये खाजगी तत्वावर चालविण्यात यावीत असा पर्याय न्यायालयाने सुचविला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने सुचविलेल्या या पर्यायावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-११-२०१५) :**(१) हे खरे नाही. खाजगीकरणाचा कोणताही पर्याय मा.न्यायालयाने सुचविलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या पर्यटन क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची निर्मितीबाबत**

**(२८) ९०७२ (०४-०८-२०१५). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पर्यटन क्षेत्रात मोठया संधी उपलब्ध असल्या तरी राज्यातील विदयापीठांच्या नाकर्तेपणामुळे या क्षेत्रात आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची निर्मिती होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ डिप्लोमा आणि सर्टीफिकेट कोर्सेस उपलब्ध करुन विद्यापीठ समाधान मानत असले तरी विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील पदवी मिळविण्यासाठी परराज्यातील विदयापीठांचा रस्ता शोधावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विदयापीठांनी विद्यार्थ्यांसाठी पर्यटनाचा पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१५) :** (१) व (२) नाही.

(३) राज्याच्या अकृषी विद्यापीठांमध्ये पर्यटन विषयाबाबत विविध अभ्यासक्रम राबविले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुर्नरचना होण्याबाबत**

**(२९) ९०८६ (०३-०८-२०१५). श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुर्नरचना होण्यासाठी सदर योजना राज्याच्या २० जिल्हयांसाठी लागू केली गेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी शासन निर्णय करुनही पोषण आहार करणाऱ्या बचत गटांना मान्य केलेली अनुदानाची वाढीव रक्कम केंद्र सरकारने आजपावेतो न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बचत गटांना केंद्र व राज्य सरकारने दिलेले अनुदान न देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप अनुदान न देण्याची कारणे काय आहेत व अनुदान केव्हा वितरित करण्यात येईल ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११--२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पोषण आहारामध्ये केंद्र व राज्य शासनाचा ५०:५० याप्रमाणात आहे. राज्यामध्ये पोषण आहारासाठी केंद्र शासनाकडून रु.२/- व राज्य शासनाकडून रु.३/- असे एकूण रु.५/- देण्यात येत होते. म्हणजे राज्य शासनाकडून रु.१/- ज्यादा देण्यात येत होता. आता केंद्र शासनाने सदरचे दर रु.४/- वरुन रु.६/- केलेले असून त्यापैकी ५०:५० हिश्याप्रमाणे केंद्र शासन रु.३/- व राज्य शासन रु.३/- अदा करावयाचे आहे. मात्र राज्य शासनाकडून यापूर्वी पासूनच रु.३/- अदा करण्यात येत असल्याने आता फक्त केंद्र शासनाकडील रु.१/- वाढ खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र पोषण आहार पुरवठ्यासाठी महिला बचत गट/महिला मंडळ/महिला संस्था यांचेशी यापूर्वीच करार झालेला असून पूर्वलक्षी प्रभावाने सदरहू पुरवठादारांना वाढीव रक्कम देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याबाबत**

**(३०) ९१३७ (०४-०८-२०१५). श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे, अॅड.निरंजन डावखरे, श्री.अनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याच्या दृष्टीने आयुर्विज्ञान परिषदेमार्फत नियुक्त केलेल्या त्रि-सदस्यीय समितीने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये दिलेल्या भेटीच्यावेळी महाविद्यालय सुरु करण्यात येणा-या अडचणीच्या अनुषंगाने २४ त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर त्रुटी कोणकोणत्या आहेत,
(३) तसेच उक्त त्रुटीपैकी किती त्रुटीची पूर्तता राज्य शासनाने केली आहे,
(४) असल्यास, उक्त दोन्ही जिल्ह्यात शासकीस वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे. फक्त चंद्रपूर जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात २४ त्रुटी आढळून आल्या आहेत. गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचे सध्या प्रस्तावित नाही.
(२) मुख्यत्वे अध्यापकवृंदाची त्रुटी भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने दाखविलेली आहे.
(३) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने दर्शविलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यात आलेली आहे.
(४) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय केंद्र शासनाच्या परवानगीने तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून सुरु करण्यात आलेले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**काछी, शाक्य, मौर्य, मुराई, सैनी, कोइरी, कोयरी व कुशवाहा या उपजातीचा इतर मागासवर्गाच्या यादीत समावेश करण्याबाबत**

**(३१) ९३४९ (२९-०७-२०१५). श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १ जून, २००४ व दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजी राज्यातील इतर मागासवर्गाच्या यादीत काही उपजातीच्या शासनाने समावेश केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या यादीतील अनुक्रमांक ८५ मध्ये काछी, शाक्य, मौर्य, मुराई, सैनी, कोइरी, कोयरी व कुशवाहा या उपजातीचा सामाजिक न्याय

विभागाने संकेतस्थळावर (ऑनलाईन इंटरनेटवर) समावेश न केल्यामुळे या उपजातीमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा व रोजगारांपासून वंचित राहावे लागत असल्याची लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर विद्यार्थ्यांना शैक्षणिक व रोजगार विषयक सुविधा मिळणेसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-११-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक ७/७/२०१५ अन्वये शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(३२) ९३५८ (३१-०७-२०१५). श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७८ ला दिनांक ३० मार्च, २०१५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तयार करुन सदर गावांना विविध नागरी सुविधा देण्याचा शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतलेला असूनही नाशिकसह बहुतांश जिल्ह्यांमध्ये अद्यापही सदर आराखडे अंतिम करुन गावांना नागरी सुविधा देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमध्ये सन २०११ च्या जनगणनेनुसार ५००० लोकसंख्येच्या गावांचा समावेश करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तातडीने तयार करून तेथे नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच प्रश्न भाग (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) लोकप्रतिनिधींमार्फत शासनाकडे मागणी प्राप्त झाली आहे.

(३) व (४) शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०११ मधील तरतुदी अन्वये राज्यात आतापर्यंत जवळपास ४०० ग्रामपंचायतींचे पर्यावरण विकास आराखडे तयार करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रस्तुत प्रकरणी दिनांक २४ ऑगस्ट, २०११ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब प्रस्तावित आहे.

---

**नाशिक राज्य परिवहन कार्यालयामध्ये निवड झालेल्या चालकाची नेमणुक करण्याबाबत**

**(३३) ९३९१ (३०-०७-२०१५). श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३ मध्ये नाशिक राज्य परिवहन विभागीय कार्यालयामध्ये निवड झालेल्या चालकांना मुंबई आगारामध्ये दिलेली नेमणुक रद्द करुन पुन्हा नाशिक राज्य परिवहन विभागीय कार्यालयांतर्गत नेमणुक देण्याचा निर्णय शासनाने घेवूनही श्री.रामदास सोनवणे यांना जाणीवपुर्वक डावलण्यात येवून त्यांना माहे मे, २०१५ रोजी पर्यंत नेमणुक आदेश देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी झालेला अन्याय दुर करुन श्री.रामदास सोनवणे यांना चालक पदावर नेमणुक देण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :** (१), (२) व (३) सरळसेवा भरती सन २०१२ अंतर्गत सन २०१३ मध्ये २३५ उमेदवारांना उसनवारी तत्वावर दिनांक ०८.०५.२०१३ पासून मुंबई प्रदेशात वर्ग करण्यात आले. सदर २०० चालकांपैकी ४३ उमेदवार रा.प.मुंबई प्रदेशात हजर झाले व उर्वरित १५७ उमेदवार हजर झाले नाहीत. यात श्री.सोनावणे यांचाही समावेश होता.

सदर १५७ चालक उमेदवारांची नाशिक विभागात नेमणूक होणेबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केल्याने दिनांक ०१.०८.२०१३ च्या पत्रान्वये १५७ उमेदवारांची पुन:श्च राज्य परिवहन, नाशिक विभागात नेमणूक देण्यात आल्या त्यानुसार नाशिक विभागात इतर उमेदवार नेमणूकीच्या ठिकाणी हजर झालेले आहेत. परंतु श्री.सोनावणे हे हजर झाले नाहीत.

सरळसेवा भरती सन २०१२ अंतर्गत चालक (कनिष्ठ) पदाची निवड यादीची मुदत दिनांक २१.०१.२०१४ रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर बाब लोकप्रतिनिधी यांना राज्य परिवहनद्वारा दिनांक १९.१०.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) नगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतीबाबत**

**(३४) ९६५६ (०६-०८-२०१५). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) नगरपालिका हद्दीतील धोकादायक व अती धोकादायक ४१ इमारतींना नगरपालिका प्रशासनामार्फत नोटीसा देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयापूर्वी सदर इमारतींची दुरुस्ती करण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, पनवेल नगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतीबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे. पनवेल नगरपरिषदेने एकूण ४६ धोकादायक व अती धोकादायक इमारतींना नोटीसा दिल्या आहेत.

(२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ च्या तरतूदीनुसार संबंधित इमारतीचे मालक/भोगवटादार यांनी दुरुस्ती करणे अपेक्षित आहे.

(३) नगरपरिषदेच्या नियोजन प्राधिकरण क्षेत्रामध्ये एकूण ४६ इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यांची माहिती नजिकच्या पोलीस स्टेशनला देण्यात आली आहे. त्यापैकी ५ इमारतीचे दुरुस्ती काम करुन वापर सुरु केला आहे. ११ इमारतीचा वापर बंद केला आहे व ३० इमारतीचा वापर सुरु आहे.

ज्या इमारतींचा वापर सुरु आहे त्यांचा विद्युतपुरवठा पाणी कनेक्शन बंद करण्याची कारवाई करण्यात येणार आहे व धोकादायक इमारतींचा वापर बंद करणेबाबत शीघ्र कारवाई करण्यात येईल.

---

**राज्य परिवहन महामंडळाचे अंतर्गत तपासणी कामगारांना देण्यात येणाऱ्या अपूर्ण पगाराबाबत**

**(३५) ९६६३ (३१-०७-२०१५). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मार्ग तपासणी कर्मचारी व चालक/वाहक हे महाराष्ट्र परिवहन कामगार कायदा १९६१ खाली येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चालक/वाहक यांना त्यांच्या रद्द केलेल्या आठवडा सुट्टीचा पगार दुप्पट दराने दिला जातो तसेच आगारांतील अन्य वाहतूक कामगारांना पगारा व्यतिरिक्त आगार भत्ता दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कायद्याखाली अंतर्भूत असलेल्या मार्ग तपासणी कामगारांना रद्द केलेल्या आठवडा सुट्टीचा पगार एम.टी.डब्ल्यू. ॲक्ट १९६१ खाली तसेच मिनीमम वेजेस ॲक्ट १९६३ नुसार दुप्पट दराने देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई व रायगड विभागातंर्गत जानेवारी, १९८८ ते डिसेंबर, २०१२ या कालावधीत आठवडा सुट्ट्या रद्द केलेल्या कर्मचाऱ्यांना महामंडळ उपरोक्त कायद्यानुसार भरपाई देणार आहे काय ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) राज्य परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाने ठराव क्र. ९९:३:०४, दिनांक ४ व ५ मार्च, १९९९ अन्वये चालक/वाहक वगळता अन्य कोणत्याही कर्मचा-यांना अतिकालिन भत्ता देऊ नये असा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार कर्मचारी वर्ग खाते परिपत्रक क्र.३४/२००१ अन्वये वरील सुचना कायम ठेवण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे मार्ग तपासणी कर्मचा-यांना भरपाई सुट्टी देण्यात येते.

---

**राज्यात खरीप हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(३६) ९७२४ (३०-०७-२०१५). श्रीमती स्मिता वाघ, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील खरीप हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तूर, कापूस व कांदा ही पिके वगळून अन्य पिकांसाठी विम्यापोटी ११३२ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन असलेल्या बाबीवर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) आतापर्यंत किती शेतकऱ्यांना विम्याचे पैसे देण्यात आले आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५) :** (१) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ मध्ये राज्यातील एकूण ३४.८७ लाख पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना रुपये १५९५.६५ कोटी एकुण नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी तूर, कापूस व कांदा ही पिके वगळून अन्य पिकांसाठीच्या नुकसान भरपाईची रक्कम रुपये ११३२ कोटी इतकी आहे.

(२) होय.

(३) एकुण नुकसान भरपाईच्या रुपये १५९५.६५ कोटी मधील केंद्र हिस्सा रुपये ६९०.७४ कोटी व राज्य हिस्सा रुपये ६९०.७४ कोटी शासनामार्फत भारतीय कृषि विमा कंपनीस वर्ग करण्यात आली आहे. सदरची रक्कम माहे जुन व जुलै, २०१५ दरम्यान भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत संबंधीत बँकांकडे लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी वर्ग करण्यात आली आहे.

(४) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ हंगामासाठी एकूण ३४.८७ लाख शेतकऱ्यांना रुपये १५९५.६५ कोटी नुकसान भरपाई रक्कम देण्यात आली आहे.

---

**राज्यात पूर्वापार लागू असलेल्या तुकडे बंदी कायदा रद्द करण्याबाबत**

**(३७) ९७३५ (३१-०७-२०१५) श्रीमती स्मिता वाघ, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पूर्वापार लागू असलेल्या तुकडे बंदी कायदा रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर तुकडे बंदी कायद्याला पर्याय म्हणून दुसरी कोणती व्यवस्था करण्यात आली आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-११-२०१५)** : (१), (२) व (३) राज्यात पूर्वापार लागू असलेल्या महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम रद्द करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला नाही.

---

**मुंबईतील वरळी येथील दूध डेअरीच्या जागेवर अद्यावत सी वर्ल्ड बांधण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३८) ९७३६ (३१-०७-२०१५). श्रीमती स्मिता वाघ, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील दूध डेअरीच्या जागेवर अद्यावत सी वर्ल्ड बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून केंद्रीय पर्यावरण विभागाने या प्रस्तावास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-११-२०१५) :** (१) प्रश्नाधिन प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. परंतु, सदर प्रस्तावास केंद्रीय पर्यावरण विभागाने मान्यता दिलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील नागपूर तसेच इतर शासकीय मेडीकल महाविद्यालय व रुग्णालयाच्या विकास कामास होणारा विलंब**

**(३९) ९७५१ (२९-०७-२०१५). श्री.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूर तसेच इतर शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील विकास कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकिय शिक्षण विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामधील असामंजस्यामुळे सदर कामाला विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंब होत असल्याने निधीत वाढ होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाढलेल्या निधी अभावी अनेक कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१५) :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) नाही.

उपलब्ध निधी, निकष व प्राधान्यानुसार कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात येतात.

---

**सन २०१५-१६ या नव्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठांव्यतिरिक्त इतर कोणत्याही विद्यापीठातील नव्या कॉलेजांना किंवा वाढीव तुकडयांनाही परवानगी न देण्याचा घेतलेला निर्णय**

**(४०) ९९८५ (०४-०८-२०१५). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-१६ या नव्या शैक्षणिक वर्षासाठी कृषी विद्यापीठांव्यतिरिक्त इतर कोणत्याही विद्यापीठातील नव्या कॉलेजांना किंवा वाढीव तुकडयांनाही परवानगी न देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून यासंदर्भातील परिपत्रक दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी जारी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ या नव्या शैक्षणिक वर्षासाठी नव्या कॉलेजांना किंवा वाढीव तुकडयांना परवानगी न देण्याची निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) सन २०१५-१६ शैक्षणिक वर्षासाठी नवीन कॉलेजस सुरु करण्याबाबत तसेच वाढीव तुकड्यांना परवानगी देण्याबाबतचे किती व कोणकोणत्या संस्थांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-११-२०१५) :**(१) शासन निर्णय दिनांक २९/०४/२०१५ नुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात नवीन महाविद्यालय/विद्याशाखा अभ्यासक्रम, तुकडी इत्यादींना परवानगी न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) राज्यातील महाविद्यालयात सुमारे २५ टक्के प्रवेशाच्या जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आल्यावरुन विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील ८२(१) नुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठानी बृहत आराखडे तयार करुन सदर बृहत आराखडे उच्च शिक्षण परिषदेसमोर सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) सन २०१५-१६ शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालयांचे २११ तर अतिरिक्त तुकडयांचे ३०६ प्रस्ताव विविध अकृषी विद्यापीठांकडून प्राप्त झाले आहेत.

---

**परभणी जिल्ह्यातील तांडा वस्ती गैरप्रकाराची चौकशी पूर्ण करण्याबाबत**

**(४१) १०२१० (०३-०८-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील तांडावस्तीवर राहणाऱ्या लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी राबविण्यात आलेल्या तांडा वस्ती सुधारणे अंतर्गत कामात गैरप्रकार केल्यावरुन दोषी असणारे ग्रामविकास अधिकारी, कनिष्ठ अभियंता व गट विकास अधिकारी यांच्यावर दोषारोपत्र निश्चित करण्याबाबतची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या मार्फत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या कामांची चौकशी पूर्ण करुन दोषी अधिकारी यांच्यावर दोषारोपपत्र न बजावता हे प्रकरण दडपण्यात येत असल्याबाबतची तक्रार मराठवाडा जनता विकास परिषदेच्यावतीने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सन २०१५ मध्ये नोंदविण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्ष कार्यवाही न करता केवळ कागदोपत्री सोपस्कार पुर्ण करुन गैर प्रकार दडपण्याचा प्रकार केल्यावरुन तक्रारीप्रमाणे चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१२-२०१५) :** (१) अशंतः खरे आहे.

(२) (३) व (४) याबाबतची तक्रार संबंधीत संस्थेने दिनांक १५/१/२०१५ व दिनांक ३०/१/२०१५ रोजी केली होती. परभणी जिल्हयातील २००५-२००६ ते २००७-२००८ या कालावधीतील एकूण १४८ मंजूर कामांची चौकशी करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले होते. त्यापैकी चौकशी करण्यात आलेल्या एकूण ७६ कामांचे बाबत चौकशी अहवालात किरकोळ स्वरुपाच्या त्रुटी

असल्याचे दिसून आल्याने संबंधीत ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता यांचे खुलासे विचारात घेऊन संबंधीतांना भविष्यात योग्य ती खबरदारी घेण्याविषयी समज देण्यात आलेली आहे.

---

**राज्यातील ४५ वर्षापासून स्थायिक असलेल्या बुडगा जंगम समाजाला जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत**

**(४२) १०४२७ (२९-०७-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील ४५ वर्षापासून स्थायिक असलेल्या बुडगा जंगम समाजाला जातीचे प्रमाणपत्र मिळत नसल्याने त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाजाला जातीचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीतील "अनुसूचित जाती" या प्रवर्गामध्ये अ.क्र.९ वर "बुडगा जंगम" या जातीची नोंद आहे. जात पडताळणी नियम-२०१२ व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या विभागाच्या दिनांक ६/२/२०१० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना, दिनांक १०/८/१९५० रोजी वा तत्पूर्वी राज्यातील सर्वसाधारण रहिवासी असण्याची अट विहित करण्यात आली आहे.

जातपडताळणी नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील हिंदुस्तान ॲन्टीबॉयटिक्स कंपनीची औषधे शासकीय रुग्णालयात प्रथम प्राधान्याने देण्याबाबत**

**(४३) २६१३८ (२०-०४-२०१२). श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील हिंदुस्तान ॲन्टीबॉयटिक्स कंपनी, लि. ही एकमेव केंद्र शासनाच्या मालकीची औषध उत्पादक कंपनी असुन या कंपनीची आर्थिकस्थिती बिकट असल्याने कंपनीला मदत करण्याच्या दृष्टीने व कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना नियमित व वेळेवर वेतन देण्याकरिता सदर कंपनीची औषधे राज्यातील शासकीय रुग्णालयात प्रथम प्राधान्याने देण्याबाबतचे आदेश व केंद्र शासनाकडून सुध्दा याबाबतच्या सूचना राज्य सरकारला देण्यात आल्या असून त्या अनुषंगाने शासनाकडे त्याबाबतचा मुदत वाढीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असून त्यावर अंतिम निर्णय झाला आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-१२-२०१५) :** (१) होय.

(२) हिंदुस्तान ॲन्टीबॉयटिक्स या केंद्र शासनाच्या अंगीकृत कंपनीकडून प्राधान्याने औषध खरेदी करण्यास दिनांक २९.०५.२०१२ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१.०३.२०१३ पर्यंत, दिनांक २९.५.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१.०३.२०१४ पर्यंत, दिनांक १६.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१.४.२०१३ ते दिनांक ३१.०३.२०१४ पर्यंत आणि दिनांक २८.०४.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१.०३.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या योजनांपासून पारधी समाज वंचित राहिल्याबाबत**

**(४४) ४५७६३ (३१-०१-२०१४). श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री. मितेश भांगडिया :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनेक वर्षापूर्वी भटकंती थांबबून वसलेली शेकडो पारधी गावे महाराष्ट्राच्या नकाशात नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाच्या योजनांपासून पारधी समाज वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) गरडापार (जि.नागपूर) या गावाला महसूली दर्जा नसल्याने शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(४) तसेच हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील शेषनगर १९६२ साली वसले असूनही अद्याप नोंद झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पारधी समाजाची गावे नकाशात नसण्याची कारणे काय आहे,

(६) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विष्णू सवरा (०२-११-२०१५) :** (१) व (२) नाही.

(३) नाही, तालुका भिवापूर, जि.नागपूर अंतर्गत मौजा. गरडापार हे गाव महसूली गावाचा दर्जा असून या गावात पारधी समाजाचे वास्तव्य आहे. या गावातील पारधी समाजातील कुटुंबियांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

(४) हिंगणा तालुक्यातील (जि.नागपूर) शेषनगर १९६२ साली वसले असून महसूली गाव म्हणून नोंद झालेली नाही.

(५) व (६) शेषनगरची नोंद महसूल गाव महसूल गाव म्हणून नाही हे खरे आहे. शेषनगर हे गाव मौजा अबांझरी प.ह.न ५८ च्या हद्दीत असुन ग्रा.प. डेगमा खुर्द मध्ये समाविष्ट आहे. शेषनगर या वस्तीची मौजा अंबाझारी येथील गाव नकाशात वेगळे गावठाण म्हणून दाखविले आहे व नविन नियमानूसार गावठाणाला गट क्रमांक नसल्यामुळे गट क्र देता येत नाही. या तालुक्यात शेषनगर वगळता इतर पारधीगावांची नकाशावर नोंद आहे. आदिवासी विकास विभागाकडून पारधी विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील पारधी समाजाच्या व्यक्तींना घरकूल व त्यांच्या वस्ती, वाडयामध्ये रस्ते, पिण्याचे पाणी इ. पायाभूत योजनांचा लाभ देण्यात येतो.

---

**तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील गायरान जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(४५) ४७४९० (०३-०२-२०१४). श्री. अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील हजारो हेक्टर गायरान जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तिवसा तालुक्यातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापपर्यंत उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-११-२०१५) :** (१), (२), (३) व (४) माहे जून व जुलै, २०१३ मध्ये तिवसा तालुक्यातील मौजा मारडा, पालवाडी, आखतवाड, शेंदोळा खुर्द, वरखेड, उंबरखेड, फत्तेपूर (जावरा), भारसवाडी, निंभोरा, देलवाडी, मुर्तिजापूर, तरोडा व शेंदुरजना बाजार येथील अंदाजे ५० हे. शासकीय ई-क्लास जमिनीवर काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण केल्याबाबतचा तक्रार अर्ज गावकरी व सचिव, ग्रामपंचायत, यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयास सादर केला होता. त्या अनुषंगाने मौजा शेंदुरजना बाजार येथे दिनांक २०/०८/२०१३ रोजी व मौजा मुर्तिजापूर, ता.तिवसा येथे माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केलेली आहे.

---

**अकोला शहरातील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाबाबत**

**(४६) ४८९४९ (०१-०७-२०१४). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील वाहनांची वाढती संख्या, रस्त्यांची स्थिती पाहता अकोल्यात नागपूरच्या धर्तीवर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोल्यात एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प राबविण्यासंदर्भात तत्कालीन मा. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी दिनांक ६ मे, २००६ रोजी लोकप्रतिनिधी व मनपा अधिका-यांची बैठक घेतली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाच्या विविध विभागाच्या ७ सदस्यांची सुकाणू समिती गठीत करुन रु.१०० कोटीची ही योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळातर्फे मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी दिनांक ५ जानेवारी, २००८ रोजी घेतलेल्या बैठकीत प्रकल्प आर्थिकदृष्टया सक्षम करण्याकरिता नविन प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे आदेश महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाला दिले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने नविन प्रस्ताव सादर केला आहे काय,

(६) असल्यास, तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) नाही.

तथापि, महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये रु. ६० कोटी आणि रु.१०० कोटी अंदाजित किंमतीच्या सुसाध्यता अहवाला संबंधी चर्चा करण्यात आली होती.

(४), (५) व (६) महामंडळाने दिनांक १६.०७.२००८ रोजी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नगर विकास विभागाने शासन निर्णय दिनांक ३१.०८.२००९ अन्वये अकोला शहर एकात्मिक रस्ते विकास योजना बांधा-वापरा व हस्तांतरित करा (BOT) या तत्वावर राबविण्यास रु.८५.७६ कोटी इतक्या रकमेस मंजूरी दिलेली आहे.

तथापि, प्रकल्प राबविल्यास जनतेवर पथकराचा भुर्दंड बसणार असल्याने व सद्य:स्थितीत जनतेचा पथकराबाबतचा असंतोष पाहता सदर प्रकल्पाबाबत महामंडळाचे स्तरावर फेरविचार करण्यात येत आहे.

---

**रमाई घरकुल आवास योजनेचा निधी बीड जिल्हा प्रशासनाने अखर्चित ठेवल्याबाबत**

**(४७) ४९४११ (०१-०७-२०१५). श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रमाई घरकुल आवास योजने अंतर्गत सन २००९ - १३ या कालावधीकरीता बीड जिल्ह्यातील ६ नगर पालिका क्षेत्रातील १०३२६ घरकुलांकरीता शासनाने १०९ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाने केवळ २५ कोटी रुपये खर्चाचे नियोजन करुन उर्वरित ८४ कोटी ४० लाख ११ हजार रुपये शासनाकडे वर्ग केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजुर निधी शासनास परत पाठविण्यामागे कोणती कारणे आहेत,

(४) असल्यास, २५ कोटी रुपये खर्चाचे नियोजन जिल्हा प्रशासनाने केले तो निधी या आर्थिक वर्षात खर्च करणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) बीड जिल्हा परिषदेकरीता सन २००९ ते २०१३ या कालावधीसाठी एकूण १०३२६ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते व त्याकरिता रुपये १०९.४० लक्ष एवढी तरतूद करण्यात

आली होती. रमाई आवास घरकुल योजनेच्या अटी व शर्ती नुसार नगरपरिषदांकडून एकूण १०५० पात्र लाभार्थीचे अर्ज प्राप्त झाले. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार बीड जिल्ह्याकरिता १५०० एवढे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्याअनुषंगाने पुरेसा निधी ठेवून उर्वरित निधी इतर जिल्हा परिषदांना वर्ग करण्यात आला आहे.

(४) मंजूर घरकुले पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक निधी नगरपरिषदांना वर्ग करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अपंग विद्यार्थी व शिक्षक यांच्या युनिट वाटपात झालेला गैरव्यवहार

**(४८) ४९५३१ (०५-०७-२०१४). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग विद्यार्थी व शिक्षक यांच्या युनिट वाटपात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदेर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीबाबत

**(४९) ५१००१ (१५-०७-२०१४). श्री.नागो गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे सन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ या आर्थिक वर्षातील भविष्य निर्वाह निधी चिठ्ठी वाटपाचे काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक शिक्षक संघटनेच्या पदाधिका-यांनी शिक्षण उपसंचालक यांच्याकडे अनेकदा तक्रारी केल्या असून याबाबत शिक्षण उपसंचालक, अमरावती यांनी दिनांक ३१ जानेवारी, २०१४ पर्यंत भविष्यनिर्वाह निधी चिठ्ठी वाटपाचे काम पूर्ण करण्याबाबतचे निर्देश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपसंचालकाच्या निर्देशाप्रमाणे अद्यापही चिठ्ठी वाटपाचे काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, भविष्य निर्वाह निधी चिठ्ठी वाटपाचे काम अंशत: पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील वाहतूक पोलिसांना प्रमुख चौकात उभे राहण्यासाठी आयलँड चौकीची व्यवस्था करण्याबाबत**

**(५०) ५१०४६ (०१-०७-२०१४). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील वाहतूक पोलिसांना एकाही प्रमुख चौकात उभे राहण्यासाठी आयलँड चौकीची व्यवस्था नसल्याचे नुकतेच माहे मार्च, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात पोलिसांच्या वाहतूक शाखेने महापालिकेकडे चौकीसाठी जागा देण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास महापालिकेने प्रतिसाद दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांना उभे राहण्यासाठी चौकी नसल्याने उन्हामुळे वाहतुक पोलीस वारंवार आजारी पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने पाहणी/चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१५) :** (१), (२), (३), (४) व (५) अकोला शहरातील चौकामध्ये वाहतूक कर्मचाऱ्यांना उभे राहण्याकरिता आयलँड नसल्यामुळे कर्मचारी वारंवार आजारी पडत आहे हे खरे आहे, याकरीता शहरातील प्रमुख चौकामध्ये आयलँड बसविण्याची परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक, अकोला यांनी आयुक्त महानगरपालिका, अकोला यांचेकडे सादर केला असता शहरातील प्रमुख चौकाच्या कोपऱ्यामध्ये नियोजनाच्या दृष्टीने ५x७ एवढी जागा ट्रॅफिक आयलँड चौकीसाठी उपलब्ध करुन देण्यास नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. काही चौक राष्ट्रीय महामार्ग क्र. २०४ वर असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला यांना पोलीस अधिक्षक, अकोला यांनी दिनांक ३/९/२०१५ च्या पत्रानुसार परवानगी देण्याबाबत विनंती केली आहे.

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण : शासकीय मुद्रणालय, नागपूर.